# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**कृषी विज्ञान विद्याशाखा**

**दूरध्वनी : 0253-2231474, 2230340, इ.मेल : dir_agri@ycmou.digitaluniversity.ac**


## इतिवृत्त

दि. 06/05/2022 रोजी सकाळी 11.30 वाजता कृषी विद्याशाखा परिषदेची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीला पुढील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. माधुरी सोनवणे, प्राध्यापक व संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा
2. श्री. राजेंद्र वाघ, सहयोगी प्राध्यापक, कृषी विज्ञान विद्याशाखा
3. डॉ. संजीवनी महाले, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
4. डॉ. सज्जन थूल, प्राध्यापक, मूल्यमापन विभाग
5. डॉ. अभय पाटील, सहाय्यक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
6. डॉ. दिगंबर एन. मोकाट, प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे
7. डॉ. स्वदेश प्रकाश , प्रमुख शास्त्रज्ञ, कृषी अर्थशास्त्र,अधिष्ठाता(SW), ICAR, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन, पंच मार्ग, यारी रोड बंद, बंगलो, अंधेरी (प), मुंबई
8. डॉ. व्ही. टी. बढे, माजी अधिष्ठाता, CAET. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
9. प्रा. दिलीप महाले, माजी अधिष्ठाता, CAET, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
10. डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके, सहयोगी प्राध्यापक, मृदा विज्ञान आणि कृषी रसायनशास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय, पुणे

श्री. राजाराम बी.पाटील, प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, नाशिक हे सदर बैठकीस विशेष आमंत्रित म्हणून उपस्थित होते.

बैठकीस पुढील सदस्य अनुपस्थित होते.

1. डॉ. लतिका गायकवाड, सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा
2. डॉ. जे. के. पुरकर, संशोधन विभाग, सहयोगी संचालक, म.फु.कृ.विद्यापीठ, राहुरी

कृषी विद्याशाखा परिषद नवनियुक्त सदस्यांची प्रथम बैठक असल्याने प्रथमतः उपस्थितांचा परिचय व स्वागत करण्यात आले. त्यानंतर कोरम पूर्ण झाल्याची खात्री करून प्रत्यक्ष बैठकीस सुरुवात झाली. याबैठकीत पुढील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. त्यातील विषय क्र. 2022/ 02, 05 ची विद्वत्त परिषदेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली.

1) **विषय क्रमांक 2022/01:** 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन माहिती पुस्तिकेस मान्यता घेणेबाबत.....

**टिपणी:** शैक्षणिक वर्ष 2022-23 या वर्षासाठी विविध प्रमाणपत्र, पदविका आणि पदवी शिक्षणक्रमांस प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत नियमावली असलेली कृषी शिक्षणक्रम माहितीपुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. सदरील

माहिती पुस्तिका नवीन शैक्षणिक वर्षास अनुरूप असे प्रवेशा संदर्भातील तसेच परीक्षा संदर्भातील वेळापत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

**प्रस्ताव:** कृषी शिक्षणक्रम माहिती पुस्तिकेतील नव्याने तयार करण्यात आलेली नियमावली चर्चा करण्यात येऊन मान्यतेसाठी सादर.

**ठराव:** वरील प्रमाणे कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत नव्याने तयार करण्यात आलेल्या कृषी शिक्षणक्रम माहिती पुस्तिकेतील विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली, सदर माहितीपुस्तिकेची Softcopy सर्व सदस्यांना तसेच विद्यापीठातील संबंधित विभागांना पाठवून त्यांच्या दि. 12 मे 2022 पर्यंत आलेल्या सूचनांचा अंतर्भाव करून त्याप्रमाणे कृषी शिक्षणक्रम माहितीपुस्तिकेस अंतिम स्वरूप देण्यात यावे. त्यानुसार त्यांच्या दि.12 मे 2022 पर्यंत आलेल्या सूचनांचा अंतर्भाव करून त्याप्रमाणे कृषी शिक्षणक्रम माहितीपुस्तिकेस अंतिम स्वरूप देण्यात आले.

2) **विषय क्रमांक 2022/02:** 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी नवीन कृषी शिक्षणकेंद्र व्यवस्थापन मॅन्युअल,2022 तयार करण्यात आलेले आहे. त्यास मान्यता घेणेबाबत...

**टिपणी:** 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून नवीन कृषी शिक्षण केंद्र व्यवस्थापन मॅन्युअल 2022 तयार करण्यात आलेले आहे. कृषी शिक्षण केंद्र व्यवस्थापन विषयी मुक्त कृषि शिक्षण धोरणास अनुसरून नव्याने अद्ययावत नियमावली असलेले कृषी शिक्षण केंद्र व्यवस्थापन मॅन्युअल तयार करण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:** कृषी शिक्षण केंद्र व्यवस्थापन मॅन्युअल मधील अद्ययावत नियमावली मान्यतेसाठी सादर.

**ठराव:** वरील प्रमाणे कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत नव्याने तयार करण्यात आलेल्या कृषी शिक्षण केंद्र व्यवस्थापन मॅन्युअल 2022 मधील विविध मुद्यांवर चर्चा करण्यात येऊन, अद्ययावत नियमावली असलेले कृषी शिक्षण केंद्र व्यवस्थापन मॅन्युअल 2022 सर्वानुमते मान्य करण्यात आले.

3) **विषय क्रमांक 2022/03:** 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत सर्व शिक्षण केंद्रांवर कार्यरत असणाऱ्या समंत्रकांच्या नावांच्या यादीस मान्यता घेणे बाबत......

**टिपणी:** कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत सद्यस्थितीत 59 मुक्त कृषी शिक्षणकेंद्र कार्यरत आहेत. या शिक्षण केंद्रांवर दोन प्रमाणपत्र, सहा पदविका तसेच दोन पदवी शिक्षणक्रमांसाठी स्वतंत्रपणे मार्गदर्शक तज्ञ नियुक्त केले जातात. दरवर्षी यामध्ये काही बदल असल्यास त्यानुसार सदर यादी वेळोवेळी अद्ययावत केली जाते. सदर यादीस परीक्षा मंडळाची मान्यता घेऊन त्यानुसारच अंतिम परीक्षा मूल्यमापनासाठी समंत्रकांना आमंत्रित केले जाते. शैक्षणिक वर्ष 2022-23 या वर्षासाठीची यादी नव्याने तयार करण्यात आलेली असून सदर यादी मान्यतेसाठी सादर

**प्रस्ताव :** नव्याने तयार करण्यात आलेल्या कृषी शिक्षणक्रमांच्या समंत्रकांच्या नावांची यादी मान्यतेसाठी सादर.

**ठराव:** कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत सुरू असलेल्या 59 कृषी शिक्षण केंद्रांकडून अद्ययावत शिक्षणक्रम निहाय, केंद्रनिहाय, विषयनिहाय मार्गदर्शक तज्ञ / समंत्रकांच्या ( शैक्षणिक वर्ष: 2022-23) यादीवर चर्चा करण्यात येऊन सदरील यादी कृषी विद्याशाखा परिषद सदस्यांकडून सर्वानुमते मान्य करण्यात आली.

4) **विषय क्रमांक 2022/04:** 2022-23 या शैक्षणिक वर्षापासून कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या कृषी शिक्षण केंद्राच्या पुनर्मान्यतेसाठीचे पडताळणी शुल्क तसेच नवीन कृषी शिक्षण केंद्रांसाठी तपासणी शुल्क यामध्ये वाढ करणेबाबत...

**टिपणी:** कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत नव्याने कृषी शिक्षण केंद्र देण्यासाठी तपासणी शुल्क ( Verification fee) सध्या रु. 20,000/- इतकी आहे. तसेच कार्यरत असणाऱ्या शिक्षणकेंद्रांच्या पुनर्मान्यता पडताळणीसाठीचे शुल्क रु.10,000/- इतके आहे. मागील पंधरा वर्षापासून यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. विद्यापीठाला सदर तपासणीसाठी येणाऱ्या एकूण खर्चाचा विचार करता नवीन केंद्राच्या तपासणीचे शुल्क रु. 30,000/- आणि जुन्या केंद्रांच्या पुनर्मान्यता पडताळणीसाठीचे शुल्क रु. 20,000/ इतके वाढविणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव :** नवीन कृषी शिक्षणकेंद्र तपासणी शुल्क रु. 30,000/- आणि सध्या कार्यरत असणाऱ्या कृषी शिक्षणकेंद्राच्या पुनर्मान्यतेसाठीचे पडताळणी शुल्क रु. 20,000/- इतके वाढविण्यास मान्यतेसाठी सादर.

**ठराव:** उपरोक्त विषयावर सर्व विद्याशाखा परिषद सदस्य सदस्यांकडून तपशीलवार चर्चा करण्यात आली त्यानुसार कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत नव्याने कृषी शिक्षण केंद्र देण्यासाठी तपासणी शुल्क सध्या रु. 20,000/- इतके आहे. ते वाढवून रु. 30,000/- इतके करावे असे कृषी विद्याशाखा परिषद सदस्यांकडून सर्वानुमते ठरविण्यात आले.

तसेच कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या कृषी शिक्षण केंद्रांच्या पुनर्मान्यता पडताळणीसाठीचे शुल्क रु. 10,000/ इतके होते. ते वाढवून रु. 15,000 /- इतके करण्यात यावे असे कृषी विद्याशाखा परिषद सदस्यांकडून सर्वानुमते ठरविण्यात आले.

5) **विषय क्रमांक 2022/05:** कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी शिक्षणक्रम प्रकल्प अहवाल मूल्यमापन तसेच तोंडी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने कृषी विज्ञान विद्याशाखे मार्फत होणेबाबत.

**टिपणी :** कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये पदवी प्रकल्प अहवाल विद्यार्थ्यांकडून विद्यापीठात सादर केला जातो. सदरील पदवी प्रकल्प अहवालाचे मूल्यमापन सध्या परीक्षा विभागामार्फत ऑफलाइन पद्धतीने होते. त्याचप्रमाणे तोंडी परीक्षा देखील ऑफलाइन पद्धतीने आयोजित केली जाते. सध्या विद्यापीठाच्या अनेक शिक्षणक्रमांचे प्रकल्प अहवाल मूल्यमापन त्याचप्रमाणे तोंडी परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होत आहे. या संदर्भातील ऑनलाइन प्रणाली देखील विद्यापीठाने काही शिक्षणक्रमांसाठी विकसित केलेली आहे. पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापन तज्ञांना प्रकल्प अहवाल मूल्यमापन प्रक्रियेची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून प्रकल्प अहवाल मूल्यमापन आणि तोंडी परीक्षा या दोन्ही बाबी ऑनलाइन पद्धतीने घेणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव :** कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापन तसेच तोंडी परीक्षा मूल्यमापन या दोन्ही बाबी कृषी विज्ञान विद्याशाखेचे मार्फत ऑनलाइन प्रणालीद्वारे व्हावे यासाठी सदरील विषय सादर.

**ठराव:** कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी प्रकल्प अहवाल मूल्यमापन तसेच तोंडी परीक्षा मूल्यमापन या दोन्ही बाबी कृषी विज्ञान विद्याशाखे मार्फत ऑनलाइन प्रणालीद्वारे करण्यात याव्यात असे कृषी विद्याशाखा परिषद सदस्यांकडून सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ऐनवेळी चर्चेसाठी आलेले विषय :**

कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या कृषी विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवी या दोन पदवी शिक्षण शिक्षणक्रमाच्या विषयी विद्यापीठ अनुदान आयोग तसेच भारतीय अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडून आलेल्या पत्रासंदर्भात कृषी विद्याशाखा परिषद सदस्यांना अवगत करण्यात आले. त्यानुसार सदर मुद्‌द्यावर सखोल आणि महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. या चर्चेअंती पुढील प्रमुख मुद्दे मांडण्यात आले :

1) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ येथे चालविण्यात येणाऱ्या कृषी विषयाच्या पदवी विषयी चौकशी करून अशा प्रकारची पदवी सुरू ठेवण्यासाठी सदर विद्यापीठास मिळालेल्या परवानगी बाबत चौकशी करून त्यानुसार आपल्या विद्यापीठाच्या कृषी पदवी सुरू करण्यासाठी अशा प्रकारची परवानगी प्राप्त करून घेता येईल का याबाबत शक्यता पडताळून पाहावी असे ठरले.
2) कृषी विज्ञान विद्याशाखेचे अंतर्गत कृषी पदवी शिक्षणक्रमांना स्वतंत्रपणे शिखर संस्थेची (UGC/ ICAR ) परवानगी मिळणे शक्य नसल्यास यासंदर्भात राज्यातील कृषी विद्यापीठे यांचेशी सामंजस्य करार करण्यात येऊन हे पदवी शिक्षणक्रम सुरू ठेवता येतील का याबाबतच्या शक्यता पडताळून पाहाव्यात असे ठरविण्यात आले.
3) कृषी विज्ञान विद्याशाखेअंतर्गत पदवी, पदविका शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या, स्वयम् रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात त्याचप्रमाणे त्यांना आर्थिक सहाय्य मिळावे यासंदर्भात विविध कृषी उत्पादने, कृषिपूरक कंपन्या, कीटकनाशके, खते, बी-बियाणे उत्पादक कंपन्या यांचेशी रोजगार निर्मितीच्या संदर्भात सामंजस्य करार करण्याबाबत शक्यता पडताळून तसेच विविध संस्थांकडून फेलोशिप अथवा स्पॉन्सरशिप विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी विद्यापीठाच्या वतीने प्रयत्न करावेत असे ठरविण्यात आले.

त्यानंतर सर्व सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे घोषित करण्यात आले.

**(डॉ. माधुरी सोनवणे)**
संचालक
कृषी विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक